महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.२०६/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक : २६३/२०२३ ते ३३१/२०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ**

**संदर्भ : जाहिरात क्रमांक-२६३/२०२३ ते ३३१/२०२३**

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवाअंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील **तसेच** नव्याने स्थापन झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, **अलिबाग, सातारा, सिंधुदुर्ग, नंदुरबार, उस्मानाबाद व परभणी** येथील **विविध विषयांतील सहयोगी प्राध्यापक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ** या संवर्गातील **एकूण १४०** पद भरती करीता दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात (जा.क्र.२६३/२०२३ ते ३३१/२०२३) प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यातील **जाहिरात क्रमांक २७७/२०२३ - त्वचा व गुप्तरोगशास्त्र (Dermatology, Venereology and Leprosy)** या संवर्गाच्या एकूण ०३ पदांच्या जाहिरातीमधील सामाजिक आरक्षण बदलाबाबत शासन पत्र, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक: बिंदुना-२०२०/प्र.क्र.२७/२०/वैसेवा-२, दिनांक ०४ जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायानुसार पदांच्या सामाजिक आरक्षणामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०३ | -- | ०३ |
| सर्वसाधारण | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०२ | -- | ०२ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |

२. आरक्षणामध्ये बदल झाल्यामुळे अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक २७७/२०२३ ला अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम कालावधी** | दिनांक १३ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९ |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | दिनांक १३ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९ |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | दिनांक १५ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९ |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी २३.५९ |

३. जाहिरात क्रमांक २७७/२०२३ नुसार विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

४. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

५. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक २७७/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दिनांक: ०५ जानेवारी, २०२४ उप सचिव, जाहिरात

ठिकाण : नवी मुंबई. महाराष्ट्र लोकसेवा आयोग

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.